राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२५

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल: sec.corp@mah.gov.in
दिनांक : १४/१०/२०२५

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय:- राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२५.

संदर्भ:- १. मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दिनांक १६/०९/२०२५ रोजी झालेला निर्णय

२. नगर विकास विभागाचे क्रएमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१०/०६/२०२५ व सुधारित कार्यक्रम दि.१४/०८/२०२५ चे पत्र

३. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६/०७/२०२५

४.राज्य निवडणूक आयोगाची क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२०/का-०७, दि.२१/०८/२०२५ रोजीची अधिसूचना

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. त्याअनुषंगाने **परिशिष्ट - १** मध्ये नमूद केलेल्या २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक आहे.

२.  २९ महानगरपालिकांपैकी २७ महानगरपालिकांची मुदत समाप्त झालेली असून उर्वरित ०२ नवनिर्मित महानगरपालिका आहेत.  मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भांकित अ. क्र. १ मध्ये दिलेल्या दि.०६/०५/२०२५ निर्णयानुसार सर्व महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका तात्काळ घेणे आवश्यक आहे.

महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी, नगरविकास विभागाच्या संदर्भीय पत्र क्र.०२ च्या प्रभागरचना कार्यक्रमानुसार २९ महानगरपालिकांची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

३.  स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदानाचा संभाव्य दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९ (१) (ब ) आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ५९) मधील कलम ७ अ अन्वये एक विशिष्ट दिनांक (Cut off date) अधिसूचित केली जाते.

४.  ज्याअर्थी, त्यानुसार विधानसभेची मतदार यादी २९ महानगरपालिकांच्या प्रभागानुसार विभागून ती सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार करणे व अधिकाऱ्यांनी अधिसूचित करणे या प्रयोजनासाठी दि. ०१/०७/२०२५ हा दिनांक संदर्भांकित क्र.४ नुसार अधिसूचित केला असून, या दिनांकास अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन वरील निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

५.  त्याअर्थी, **दिनांक ०१/०७/२०२५ रोजी** अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

# आदेश

६. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-**

राज्य निवडणूक आयोगाने दि.२१/०८/२०२५ च्या अधिसूचनेन्वये **दि. ०१/०७/२०२५** ही Cut off date जाहीर केली असून, त्या दिवशी (**म्हणजेच दि.०१/०७/२०२५ रोजी**) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी परिशिष्ट - १ मधील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल. या मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदार याद्यांचे विभाजन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. याकरिता राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/ प्र.क्र.०३/का-८, दि.१६/०७/२०२५ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

७. **मतदार यादी कार्यक्रम:-**

वरील मतदार यादी ग्राह्य धरुन परिशिष्ट - १ मधील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट - २ मध्ये नमूद केल्यानुसार राहील. सदर कार्यक्रमानुसार मतदार यादी विभाजनाची कार्यवाही सर्व महानगरपालिकांनी तात्काळ सुरू करावी. तसेच सदर कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा विहित कालमर्यादेत पूर्ण होईल याची संपूर्ण दक्षता संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी घ्यावी.

८. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

८.१ संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालील बाबींचा विचार करुन प्रभागनिहाय विभाजन करावे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने नवीन संकेतस्थळ https://mahasecvoterlist.in विकसित केले असून या संकेतस्थळाचा वापर करावा :-

(i) दि. ०१ जुलै, २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संकेतस्थाळावरुन आयोगाने दिलेल्या युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन डाऊनलोड करुन घेण्यात यावी.

(ii) सोबतच्या **परिशिष्ट - १** मध्ये नमूद २९ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांकरीता संबंधित महानगरपालिकांना आयोगातील संगणकीकरण कक्षाकडून तयार केलेले युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

(iii) युजर आयडी व पासवर्ड नुसार Election Assembly Master, Ward Master इ. अपलोड करावे. कंट्रोल चार्ट तयार करुन तो योग्य असल्याची खात्री करावी व तो योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून आपल्या स्तरावर मतदार यादीच्या PDF तयार करुन घ्याव्यात.

८.२ **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत २९ महानगरपालिकांच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि महानगरपालिकांसाठी तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान असणे आवश्यक आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत, मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का-८, दि.१६/०७/२०२५ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासावेत.

क) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-ग्रापनि२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६ जुलै, २०२५ चे आदेश)

८.३ महाआयटीतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने **परिशिष्ट - १** मध्ये नमूद केलेल्या २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे. (https://mahasecvoterlist.in या URL वर उपलब्ध असणारा मदररोलच ग्राह्य धरण्यात येणार आहे.)

९. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला सर्व महानगरपालिका आयुक्त यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद १२ प्रमाणे)

१०. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

१०.१ सर्व महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने विहित मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

i. लेखनिकांच्या काही चुका.

ii. दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

iii. संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

iv. मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती किंवा सूचना प्राप्त झाल्यास त्याची नोंद मार्क कॉपी मध्ये घेणे.

१०.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

११. महानगरपालिका आयुक्त यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना विहित तारखेस प्रसिध्द करुन त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद १२ प्रमाणे)

१२. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस महानगरपालिका आयुक्त यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे:-

(i) महानगरपालिकांचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र.

(iii) स्थानिक केबल टि.व्ही.

(iv) महानगरपालिकांचे संकेतस्थळ, इत्यादी.

१३. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम स्थगित करुन त्याबाबतचा अहवाल महानगरपालिका आयुक्तांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१४. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व नोडल अधिकारी (उपायुक्त, निवडणूक) यांची राहील.

१५. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाचे नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास ई-मेलद्वारे संपर्क साधण्यात यावा आणि अत्यंत महत्त्वाचे कारण असल्यास दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

**श्री. समीर गंदपवार (संगणकीकरण कक्ष)**
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५० / २२०२२९०९,
email - sec.compu@mah.gov.in

१६. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

१४.१०.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र- परिशिष्ट- १ व २**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व महानगरपालिका आयुक्त.
५. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
६. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
८. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
९. निवड नस्ती (का-५)

परिशिष्ट - १

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिकेचे नाव | वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | मुंबई | बृहन्मुंबई | अ+ |
| २ | | ठाणे | ठाणे | ब |
| ३ | | | नवी मुंबई | क |
| ४ | | | उल्हासनगर | ड |
| ५ | | | कल्याण-डोंबिवली | क |
| ६ | | | भिवंडी-निजामपूर | ड |
| ७ | | | मिरा-भाईंदर | ड |
| ८ | | पालघर | वसई-विरार | क |
| ९ | | रायगड | पनवेल | ड |
| १० | नाशिक विभाग | नाशिक | नाशिक | ब |
| ११ | | अहिल्यानगर | अहिल्यानगर | ड |
| १२ | | जळगाव | जळगांव | ड |
| १३ | | धुळे | धुळे | ड |
| १४ | | नाशिक | मालेगांव | ड |
| १५ | पुणे विभाग | पुणे | पुणे | अ |
| १६ | | | पिंपरी-चिंचवड | ब |
| १७ | | सोलापूर | सोलापूर | ड |
| १८ | | कोल्हापूर | कोल्हापूर | ड |
| १९ | | | इचलकरंजी | ड |
| २० | | सांगली | सांगली-मिरज-कुपवाड | ड |
| २१ | छत्रपती संभाजीनगर विभाग | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | क |
| २२ | | नांदेड | नांदेड-वाघाळा | ड |
| २३ | | परभणी | परभणी | ड |
| २४ | | जालना | जालना | ड |
| २५ | | लातूर | लातूर | ड |
| २६ | अमरावती विभाग | अमरावती | अमरावती | ड |
| २७ | | अकोला | अकोला | ड |
| २८ | नागपूर विभाग | नागपूर | नागपूर | अ |
| २९ | | चंद्रपूर | चंद्रपूर | ड |

परिशिष्ट - २

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या
सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | ०१/०७/२०२५ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांना दिलेल्या युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन दि.०१ जुलै, २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरुन डाऊनलोड करणे. | १४/१०/२०२५ |
| ३ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार केलेली प्रारुप मतदार यादी, हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०६/११/२०२५ |
| ४ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | १४/११/२०२५ |
| ५ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | २८/११/२०२५ |
| ६ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे | ०४/१२/२०२५ |
| ७ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | १०/१२/२०२५ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(सुरेश काकाणी)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र